# ग्रामीण वाङ्‌मयाचा इतिहास

संपादक

रामचंद्र काळुंखे



Scanned with OKEN Scanner

◆ **ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास**
(Grameen Wangmayacha Itihas)
**डॉ. रामचंद्र काळुंखे**

◆ **प्रकाशक :**
के. एस. अतकरे,
कैलाश पब्लिकेशन्स,
औरंगपुरा, औरंगाबाद.
संपर्क : ९३२५२१४१९१

© **सौ. मीना काळुंखे**

◆ **अक्षरजुळणी :**
देवयानी कॉम्प्युटर्स,
१५३, बालाजीनगर, औरंगाबाद.
संपर्क : ९४२०६२२०७९

◆ **मुद्रणस्थळ :**
हरिओम ऑफसेट,
सिडको, औरंगाबाद

◆ **प्रथमावृत्ती :**
१५ जुलै २०१६

◆ **मुखपृष्ठ :** सरदार

◆ ISBN - 978-93-84451-77-6

◆ **किंमत : ३३० रुपये**

*संपादित स्वरूपाच्या या पुस्तकातील लेखांत व्यक्त झालेली मते, विचार, घेतलेल्या नोंदी यांची जबाबदारी तसेच लेखांचे अधिकार हे सर्व त्या-त्या लेखकांचे राहतील.*

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रम


■ संपादकीय ३

१. मध्ययुगीन साहित्यातील कृषी-ग्राम संवेदन
- डॉ. विद्यासागर पाटांगणकर १५

२. वैचारिक लेखनातील कृषी-ग्राम संवेदन
- प्रा. श्रीकांत देशमुख ३८

३. ग्रामीण कविता : प्रारंभ ते १९४७ - डॉ. योगिता पाटील ७७

४. ग्रामीण कविता : १९४७ ते १९७५ - प्रा. रूपाली शिंदे ९३

५. ग्रामीण कविता : १९७५ ते १९९० - डॉ. फुला बागूल ११०

६. नव्वदनंतरची ग्रामीण कविता - डॉ. पी. विठ्ठल १३०

७. ग्रामीण कथा : प्रारंभ ते १९४७ - डॉ. गणेश मोहिते १४०

८. ग्रामीण कथा : १९४७ ते १९७५ - डॉ. अनिरुद्ध मोरे १५०

९. ग्रामीण कथा : १९७५ ते १९९० - डॉ. केशव तुपे १६८

१०. नव्वदनंतरची ग्रामीण कथा - डॉ. रविकांत शिंदे १८४

११. ग्रामीण कादंबरी : प्रारंभ ते १९४७ - डॉ. दत्ता घोलप १९७

१२. ग्रामीण कादंबरी : १९४७ ते १९७५ - डॉ. राजशेखर शिंदे २१४

१३. ग्रामीण कादंबरी : १९७५ ते १९९० - डॉ. महेश खरात २२३

१४. नव्वदनंतरची ग्रामीण कादंबरी - डॉ. शेषराव मोहिते २३८

१५. ललित गद्यातील ग्रामजाणीव - प्रा. ज्ञानेश्वर खिल्लारी २५१

१६. ग्रामीण स्वरूपाची चरित्रे-आत्मचरित्रे - डॉ. कैलास अंभुरे २७१

१७. ग्रामीण साहित्याची समीक्षा - डॉ. माधव पुटवाड २८१

■ लेखकांचा परिचय ३१४


Scanned with OKEN Scanner

७.

# ग्रामीण कथा : प्रारंभ ते १९४७

- डॉ. गणेश मोहिते

अतिप्राचीन काळापासून मानवाला गोष्ट सांगण्याची व ऐकण्याची आवड असलेली दिसून येते. याचाच अर्थ असा, की अनादी काळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरूपात 'कथा' अस्तित्वात असल्याचे आढळते. अगदीच मराठी भाषेच्या आरंभापासून 'कथात्मक' स्वरूपाचे दर्शन घडते. रिकाम्या वेळी जिथे जिथे एकापेक्षा अधिक माणसांचा समूह असे, तेथे तेथे रिकामा वेळ घालविण्यासाठी गोष्टी सांगितल्या-ऐकल्या जात असत. लहानपणीच आजीबाईच्या गोष्टींमुळे गोष्टीची आवड मानवी मनात निर्माण होत आली आहे. आपणास माहीत नसणारी माहिती मिळविण्याची आणि इतरांपेक्षा वेगळी माहिती देण्याची मानवाची सहजप्रवृत्ती आहे. यातूनच 'कथन' आणि 'श्रवण' करण्याची पद्धती रूढ झाली. म्हणजेच 'कथा' या वाङ्मय प्रकाराचे मानवी लोकजीवनाशी जवळचे नाते आहे हे स्पष्ट होते.

कथा ही लोकजीवनाच्या अंगोपांगात भिनलेली एक अनन्यसाधारण प्रवृत्ती असून लोकजीवनात आदिम काळापासून ते आजतागायत 'लोककथा' वेगवेगळ्या प्रकारे सांगितल्या व ऐकल्या जात आहेत. जगातील सर्व भाषिक समूहांत, सर्व समाजस्तरांतून लोककथा रूढ झालेल्या दिसतात. याच अतिपुरातन लोककथांमधून मराठी कथेची बीजे सापडतात. वैदिक वाङ्मयात 'यम-यती', 'सरमापणी' यांच्या कथा आढळतात. पुढे बृहद्कथा, हितोपदेश, पंचतंत्र, जातक अशा प्राकृतातील कथा आढळतात. वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, बृहद्कथा मंजिरी आदी कथांचा प्रपंच चौदाव्या शतकापर्यंत येतो. ग्रामीण कथेच्या प्राचीन पाऊलखुणा आपण जेव्हा तपासतो तेव्हा लोकवाङ्मयातील 'सटवीचा लिखा' या लोककथेचा ग्रामीण जीवनजाणिवेच्या संदर्भाने विचार केला जातो. या लोककथेतून ग्रामीण समाजरचना आणि ग्रामीण व्यक्तीची मनोरचना प्रामुख्याने ध्वनित होते. लोककथेसंबंधी डॉ. कोत्तापल्लेंचे मत विचारात घेता येते : "ग्रामीण साहित्याचा विचार करीत